| | |
|---|---|
| MHPU020016032016 | **स्पेशल दिवाणी दावा क्र.४००/२०१६**<br>**विजयकुमार जयवंत दंताळे**<br>**वि.**<br>**गुलाबबाई गजानन दंताळे मयत तर्फे**<br>**वारस प्रभादेवी सदानंद थोरात व इतर** |

## नि.क्र. १८२ वरील आदेश

वादीतर्फे कुलमुखत्यार धारक यांनी प्रतिवादी क्र.१अ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यांच्या कथनानुसार, दाव्यातील प्रतिवादी क्र. १अ श्रीमती प्रभावती सदानंद थोरात यांचे दि. ०५/०४/२०१८ रोजी पुणे येथे झाला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१क श्रीमती उषा अमर आंबेकर यांचा मृत्यु दि.०७/१२/२०१७ रोजी पुणे येथे निधन झालेले असुन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. १अ व १क चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता सदर अर्ज दाखल केला आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.१अ श्रीमती प्रभावती सदानंद थोरात व प्रतिवादी क्र.१क श्रीमती उषा अमर आंबेकर यांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस खालीलप्रमाणे आहेत.

**प्रतिवादी क्र.१अ – कै. श्रीमती प्रभावती सदानंद थोरात यांचे कायदेशिर वारस**

**१अ-१]** सौ. सुधा शशिकांत टोकेकर (मुलगी)
वय ६७ वर्ष, धंदा- घरकाम,
रा.बी - १९, नचिकेत अपार्टमेंट,
हॉटेल वुडस् विला समोर, डी.पी. रोड,
कर्वेनगर, पुणे ४११०५२.

**१अ-२]** श्रीमती रेखा मदन अंजूरकर (मुलगी)
वय ६६ वर्ष, धंदा- घरकाम,
रा.व्दारा, कामत, फ्लॅट क्र. इ ६,
चिंतामणी कॉम्प्लेक्स, मयुर कॉलनी, पुणे ४११०३८.

**प्रतिवादी क्र.१ क– कै. श्रीमती उषा अमर आंबेकर यांचे कायदेशिर वारस**

**१क-१]** श्री. सागर अमर आंबेकर (मुलगा)
वय ४७ वर्ष, धंदा- घरकाम,
रा. १४५५, कसबा पेठ, पुणे ४११०११

त्यामुळे प्रतिवादी क्र. १अ व १क वरीलप्रमाणेच कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांना वारस म्हणुन अभिलेखावर घेणेची विनंती केलेली आहे.

**४.** सदर अर्जावर प्रतिवादी यांच्यातर्फे आज पर्यंत म्हणणे दाखल केल्याचे दिसुन आले नाही. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादीने दस्तऐवज यादी नि.क्र. १८१ नुसार प्रतिवादी क्र.१अ (प्रभावती) आणि प्रतिवादी क्र.१क (उषा) यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रती दाखल केल्या आहेत. त्यानुसार प्रभावती यांचा मृत्यु दि.०५/०४/२०१८ रोजी झालेला दिसून येतो तर उषा आंबेकर यांचा मृत्यु दि.१७/१२/२०१७ रोजी झालेला दिसून येतो. सदरच्या अर्जासोबत मयत प्रतिवादींचे वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज सुध्दा दाखल केलेला दिसून येतो.

**५.** प्रकरणात मुळ वादी विजय कुमार हे सुध्दा मयत झालेले असून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज नि.क्र. १९५ नुसार दाखल केलेला आहे. सदर वादी विजयकुमार यांचा मृत्यु दाखला दस्तऐवज यादी नि.क्र. १९६ सोबत दाखल केला आहे. यांच्या मृत्यु प्रमाणपत्रावरून दि.१४/०१/२०२६ रोजी झालेला दिसुन येतो.

**६.** प्रतिवादींनी प्रतिवादी क्र.१अ आणि प्रतिवादी क्र.१क मृत्युस हरकत घेतलेली दिसुन आली नाही. दि.११/१२/२०१८ रोजी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज वादीतर्फे कुलमुखत्यार धारक मुलगा अनुप याने दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज मुदतीत दाखल केलेला दिसून येत नाही. वादी वयस्कर असल्याने प्रतिवादीच्या मृत्युबाबत व वारसांची माहिती घेण्यास उशीर झाल्याचे अर्जदार यांचे कथन आहे. त्याबाबत नि.क्र. १८४ व नि.क्र. १८७ नुसार विलंब माफी व निरस्त

आदेश रद्द करण्याचे अर्ज अभिलेखावर दाखल केलेले दिसून येतात. सदरचा दावा हा २००१ सालचा असून दाव्याचे मुल्य वाढल्यानंतर तो विशेष दिवाणी दावा म्हणून २०१६ साली नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. त्यापुर्वीच प्रकरणातील बराचसा पुरावा होऊन प्रकरण युक्तीवादाकरीता होते. त्यानंतर काही प्रतिवादीचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र.२अ हजर होऊन त्यांनी दाखल केलेल्या विविध अर्जान्वये प्रकरण प्रलंबित होते.

७. अभिलेखावरील कागदपत्रांचे सुक्ष्मपणे अवलोकन केले. प्रकरणातील वारसांच्या दाखल केलेल्या नि.क्र. १८२ वरील अर्जात नमुद व्यक्ती हे मुळ प्रतिवादी क्र.१अ आणि १क यांचे कायदेशीर व सरळ वारस असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. प्रस्तुतच्या अर्जास उर्वरीत प्रतिवादी यांनी हरकत न घेतल्याने वादीचे कथन समर्पक व संयुक्तीक वाटते. तसेच मयत प्रतिवादींना या अर्जामधील नमुद वारसां व्यतिरिक्त इतर वारस नसल्याचे वादीचे वारसांचे कथन असल्यामुळे व कोणताही आक्षेप किंवा हरकत अभिलेखावर न आल्याने, मुळ वादीचे वय प्रकरणाचे स्वरूप सद्यस्थिती बघता प्रथमदर्शनी सदर अर्ज जाणीवपुर्वक विलंब करून दाखल केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रकरणात (abatement) निरस्त आदेश पारीत झालेला दिसून आला नाही. तरी औपचारीकरित्या निरस्त आदेश रद्द करण्याकरीता व विलंब माफीकरीता वेगळे अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकरणाच्या योग्य व रास्त निर्णयाकरीता दाव्याचे स्वरूप बघता मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक असल्याने, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. मुळ प्रतिवादी क्र.१अ प्रभावती थोरात आणि प्रतिवादी क्र.१क उषा आंबेकर यांचे वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीचे वारसांना असा आदेश देणेत येतो की, त्यांनी मुळ प्रतिवादी क्र.१अ प्रभावती थोरात आणि प्रतिवादी क्र.१क उषा आंबेकर यांचे नांव कमी करुन त्यांचे वारसांची नांवे वादी म्हणुन नमुद करावीत.

**३.** सदरची दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसांमध्ये दाखल करावी.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2026.07.27 17:21:59 +0530

**दि.२७/०७/२०२६** **(वाय.डी. कोईनकर)**

**पुणे.** **२१ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, पुणे.**

## CERTIFICATE

" I affirms that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original."

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. Y. D. Koinkar<br>21st Jt. C. J. S. D. & Addl. C.J.M., Pune. |
| Name of the Stenographer | : | Shri M. K. Nerkar |
| Date of Order | : | 27/07/2026 |
| Order signed by PO on | : | 27/07/2026 |
| Order uploaded on | : | 27/07/2026 |